## प्रेसनोट

**विषयः- दिव्यांग व्यक्तीच्या कल्याणार्थ राबविण्यात येणाऱ्या सन २०१७-१८ या वर्षातील योजनांची माहिती प्रसिध्द करणेबाबत.**

**१. अपंग व्यक्तीना WhatsApp/Call Center स्थापन करणे.**

मा. जिल्हाधिकारी, यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतीला निर्देशाप्रमाणे दिव्यांग व्यक्तीना व्यक्तीगत योजनेचा लाभ व समस्येबाबत कळविण्यासाठी समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद लातूर या विभागामार्फत Call Center स्थापन करण्यात आलेली आहे. दिव्यांग व्यक्तीना काही समस्या /अडचणी असल्यास मोबाईल क्र. ९४२०३३४१४४ या क्रमांकावर WhatsApp वर chat किंवा message कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत संपर्क करु शकतात.

**२. अपंग व्यक्तीना लघुउदयोगासाठी बिंज भांडवल योजना**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासननिर्णय क्रं अपंग-२००८/प्र.क्रं २१२/सुधार-३ मुंबई दिनांक २ जूलै २०१० अन्वये अपंग व्यक्तीना स्वयंरोजगारासाठी बिंज भांडवल योजनेअर्तगत .वैद्यकिय मंडळाने दिलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र किमान ४० टक्के अपंग असणारे लाभार्थ्यांची प्रकल्प खर्च मर्यादा रक्कम १५०,०००/- असून प्रकल्प खर्चाच्या जास्तीत जास्त २०% एवढी रक्कम अनूदान व उर्वरीत रक्कम ८०% राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्जरूपात देण्यात येते. वार्षिक उत्पन्न मर्यादा १,००,०००/-इतकी आहे. सदर योजनेसाठी वयोमर्यादा १८ ते ५० आहे.सदर योजनेचा लाभ अंशतःअंध,अस्थिव्यंग,कर्णबधिर या अपंग प्रवर्गाची व्यक्तीच लाभ घेवू शकतात.

**३. अपंग विद्यार्थ्यांना शालांतपूर्व शिष्यवृती योजना/मॅट्रिकोत्तर अपंग शिष्यवृती**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासननिर्णय क्रं अपंग-२००३/प्र.क्रं ७०/सुधार-२ मुंबई दिनांक १५ नोव्हेबर २००३ अन्वये अपंग विद्यार्थ्यांना शालांतपूर्व शिष्यवृती योजना ही राज्यातील इयता १ ली ते १० वी पर्यत प्राथमिक,माध्यमिक शिक्षण घेणारे.वैद्यकिय मंडळाने दिलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र किमान ४० टक्के अपंग असणारे अंध ,अंशतःअंध,अस्थिव्यंग,कणबधिर व विशेष शाळेत शिकणारे मतिमंद या अपंग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृती त्याचे इयतेप्रमाणे दरमहा दराने प्रदान केली जाते.

तसेच शासननिर्णय क्रं इडीडी /प्र.क्रं ७१/सुधार-२ मुंबई दिनांक १५ नोव्हेबर २००३ अन्वये अपंग विद्यार्थ्यांना शालांतपरिक्षोत्तर शिष्यवृती योजना ही राज्यातील महाविद्यालयीन शिक्षण घेणारे इयता ११ वी ते कला, वाणिज्य, विज्ञान शाखेत पदवी ते पदव्यूत्तर व वैद्यकिय, अ-२००३भियांत्रिकी,ॲग्रीकल्चर,शिक्षण पदविका,बी.एड व यासारखे ईतर पदवी ते पदव्यूत्तर पर्यत शिक्षण घेणारे अंध,अंशतःअंध,अस्थिव्यंग,कणबधिर या अपंग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृती अभ्यासक्रमाप्रमाणे दरमहा निर्वाह भता ,प्रवेश फी, टयूशन फी व ईतर फी प्रदान केली जाते.मागील वर्षी शिष्यवृत्ती मंजूर झालेली अर्जदाराने नुतनीकरणाचा अर्ज परिशिष्ठ ब मधील विहित नमुन्यात ३१ ऑगस्ट पुर्वी सादर करावे तसेच नविन अर्जदाराने शिष्यवृत्तीचा नविन अर्ज परिशिष्ठ अ मधील विहित नमुन्यात ३० संप्टेबरपुर्वी जिल्हा समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषद,लातूर सादर करावे

(P.T.O)

४. **अपंग व्यक्तीना बस सवलत योजना**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रं संकीर्ण 2015 /प्र.क्रं 53 / समन्वय/मुबई दिनांक 24/11/2015 अन्वये** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015 अंतर्गत अधिसुचित सेवा www.aaplesarkar.maharashtra.gov.in या पोर्टलवर महाऑनलाईनव्दारे ऑनलाईन करण्याची कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. सदर प्रस्ताव हे ऑन लाईन पध्दतीनेच जिल्हा समाज कल्याण कार्यालय,जिल्हा परिषद,लातूर येथे पाठविण्यात यावे. वैद्यकिय मंडळाने दिलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र किमान ४० टक्के अपंग असणारे अंशत:अंध, अस्थिव्यंग, कणबधिर व मतिमंद प्रर्वगाचे व्यक्तीना महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाकडून प्रवासाचे २५ टक्के दराची सवलत दिली जाते.

**५.अपंग-अव्यंग विवाह करणारे दापंत्यास प्रोत्साहन अनुदान**

अपंग-अव्यंग विवाह करणारे दापंत्यास प्रोत्साहन अनुदान या योजनेअर्तगंत ५०,०००/- अनुदान या कार्यालयाव्दारे वितरीत केले जाते.सदर योजनेअर्तगंत एक दिव्यांग व्यक्ती असावा तर दुसरा सदृढ असावा.व तो या जिल्हयातील रहिवासी असावा.

जिल्हा समाज कल्याणअधिकारी
जिल्हा परिषद,लातुर